महाराष्ट्राचे निडर दैनिक
# शौर्य मराठी
RNI-MAHMAR/2023/89125
epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | शनिवार , दि. २१ मार्च २०२६ | वर्ष २ रे | अंक १२९ किंमत : ५ रु. | पाने ४

**दिन विशेष...**

✲ जागतिक वनदिन.

१८९० : 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ' या विख्यात संघटनेचे जनक डॉ.केशव बळीराम हेडगेवार यांचा जन्मदिन.

१९१६ : जगप्रसिध्द सनईवादक उस्ताद बिस्मिल्ला खाँ यांचा जन्मदिन.

१९९२ : भारताची शंकूल ही दुसरी पाणबुडी नौदलात सामील झाली.

सेन्सेक्स ७४,५३२.९६ +३२५.७२ (०.४४%)
डॉलर ₹ ९३.६७

**आजचे तापमान** (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३५ | १८ |
| दिल्ली | २७ | १३ |
| मुंबई | ३४ | २३ |
| नागपूर | ३४ | १९ |
| पुणे | ३४ | १५ |



'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ' या विख्यात संघटनेचे जनक **डॉ.केशव बळीराम हेडगेवार** यांचा जन्मदिन.

**सुविचार**

सकारात्मक विचार करा, आणि आपल्या आयुष्यात सकारात्मकता आकर्षित करा.

सूर्योदय - सूर्यास्त
स.-६:३१ संध्या-६:३९

**सोने – चांदी**

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,५१,९७५/- २,५५,०००/-

# अस्पृश्यता, विषमता हा सर्वात मोठा अपराध : मुख्यमंत्री

## चवदार तळे जलशुद्धीकरण व परिसर सुशोभीकरण प्रकल्पाचे उद्‌घाटन

वृत्तसंस्था । रायगड

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चवदार तळ्याच्या आंदोलनाच्या माध्यमातून माणसाला मानवतेची जाणीव करून दिली. या आंदोलनाच्या माध्यमातून भारताला समतेकडे नेले. मुळात अस्पृश्यता व विषमता हा सर्वात मोठा अपराध आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २० मार्च १९२७ रोजी रायगड जिल्ह्यातील महाड येथील चवदार तळ्याचे पाणी चाखून ऐतिहासिक सत्याग्रह केला होता. या सत्याग्रहाला आज १०० वर्षे पूर्ण झाली. यानिमित्ताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी महाडला भेट देऊन चवदार तळे जलशुद्धीकरण व परिसर सुशोभीकरण प्रकल्पाचे उद्घाटन केले. यावेळी केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, राज्याचे सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट, मंत्री उदय सामंत, मंत्री भरत गोगावले, आमदार प्रवीण दरेकर आदी नेते व अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस यावेळी बोलताना म्हणाले, चवदार तळ्याचा सत्याग्रह हा भारताच्या इतिहासातील एक निर्णायक क्षण होता. बहिष्कृत भारतमध्ये ३ एप्रिल १९२७ रोजी बाबासाहेबांनी चवदार तळ्याच्या आंदोलनाची माहिती देताना सांगितले होते की, ज्या प्रकारे फ्रेन्च राज्यक्रांतीने जगाचा इतिहास बदलला, अगदी त्याचप्रकारे या आंदोलनाने भारताचे भविष्य बदलणार आहे. गुलामगिरीच्या साखळ्या सोडून एक मोठा न्याय प्राप्त होणार आहे. भारतीय समाजात अनेक वर्षे आपल्याला गुलामगिरीत काढावी लागली. या गुलामगिरीच्या मुळाशी काय आहे? आपण सातत्याने गुलाम का झालो? हे पाहिले तर त्यामागे आमच्या समाजातील अनिष्ठ प्रथा होत्या. आमच्या समाजात अस्पृश्यता होती.



आमच्या समाजामध्ये जातीभेद होता. अशा पद्धतीचा विखंडित समाज नेहमी पराभूत होतो. त्यामुळे या पराभवातून शेकडो वर्षांची गुलामगिरी आपल्याला सहन करावी लागली. अशा कुप्रथा आल्या नसत्या तर कदाचित भारत केव्हाच गुलाम झाला नसता, असे ते म्हणाले.

आजचा दिवस हा अत्यंत महत्त्वाचा आहे. कारण, भारताच्या इतिहासात चवदार तळ्याचा सत्याग्रह हा भारताला समतेकडे नेणारा होता. जेव्हा माणूस माणसाला माणूस म्हणून माणण्यास तयार नव्हता. तेव्हा बाबासाहेबांनी या सत्याग्रहाच्या माध्यमातून माणसाला मानवतेची जाणीव करून दिली. तेव्हा या देशात विषमता होती. या विषमतेने जी व्यवस्था निर्माण केली, त्या व्यवस्थेनेच आपल्याला गुलामगिरी स्वीकारावी लागली. (पान २ वर)

**चवदार तळे परिसराचे होणार सुशोभीकरण**
**मुख्यमंत्र्यांनी मुख्य सोहळ्यानंतर पत्रकारांशीही संवाद साधला. त्यात त्यांनी सरकार चवदारतळ्याच्या सुशोभीकरणासाठी कटिबद्ध असल्याचे स्पष्ट केले. ते म्हणाले, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी महाड येथे चवदार तळ्याचा सत्याग्रह केला. त्या सत्याग्रहाच्या शताब्दीच्या निमित्ताने आम्ही येथे आलो आहोत. सरकारने बाबासाहेबांना वंदन करून चवदार तळ्याच्या सुशोभीकरणाच्या व इतर विविध गोष्टी उभारण्याच्या संदर्भात आराखडा तयार केला आहे. त्याचे भूमिपूजनही आम्ही येथे केले आहे.**

## थोडक्यात

### पाचोरा, जामनेर रेल्वे मार्ग जमीन मोजणीचा वाद चिघळला

**जळगाव ।** जिल्ह्यात पाचोरा, जामनेर, बोदवड ब्रॉडगेज रेल्वे मार्गासाठी सुरू असलेल्या जमीन अधिग्रहण प्रक्रियेला शेतकऱ्यांचा तीव्र विरोध कायम आहे. प्रशासनासोबतची तिसरी बैठक ठोस निर्णय न झाल्याने निष्फळ ठरली आहे. योग्य मोबदला आणि पर्यायी सुविधा मिळाल्याशिवाय जमीन मोजणीस परवानगी देणार नाही, अशी ठाम भूमिका शेतकऱ्यांनी पुन्हा एकदा घेतल्याने या रेल्वे प्रकल्पाच्या कामांवर अनिश्चिततेचे सावट गडद झाले आहे. केंद्र सरकारच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांपैकी एक मानल्या जाणाऱ्या रेल्वे मार्गामुळे जामनेर, पाचोरा आणि बोदवड तालुक्यांतील संपर्क सुलभ होणार आहे.

### साडेचार कोटी लोकांना सतावणार अन्नाची चिंता?

**नवी दिल्ली ।** भारतासह जगातील अनेक देशांमध्ये शेती आधुनिक पद्धतीने केली जाते. शेतीला पाणी देणे, शेतमालाची वाहतूक करणे तसेच शेतीत मशिनरींचा वापर करणे या सगळ्या कामांसाठी ऊर्जेचा वापर केला जातो. सध्या कच्च्या तेलाच्या किंमतीत वाढ होत असल्याने शेतीचा खर्चदेखील वाढणार आहे. त्याचा परिणाम अन्नाधान्य, भाजीपाला यांच्या वितरणावर होणार आहे. ब्लुमबर्गच्या अहवालानुसार, इंधनाच्या तुटवड्याने जगातील काही भागांमध्ये अन्न पुरवठाच विस्कळीत झाला आहे.

# जळगाव तालुक्यात ११ कोटींचा केळी पीकविमा घोटाळा

## भोकर परिसरातील आठ 'सीएससी' केंद्र चालकांवर गुन्हे दाखल!

प्रतिनिधी । जळगाव

**जिल्ह्यात पुनर्रचित हवामानावर आधारित फळ पीकविमा योजना (आंबिया बहार) २०२५–२६ अंतर्गत केळी पीकविमा प्रस्तावांच्या पडताळणीदरम्यान मोठ्याप्रमाणावर अनियमितता उघड झाली आहे. शेतात केळी नसतानाही शेतकऱ्यांना बोगस विमा अर्ज सादर करण्यासाठी मदत करणाऱ्या तब्बल ४८ सामायिक सुविधा केंद्र (सीएससी) चालकांवर गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. ज्यामध्ये भोकर भागातील आठ केंद्र चालकांचाही समावेश आहे.**




पुनर्रचित हवामान आधारित फळपिक विमा योजनेत जिल्ह्यातील एकूण ९९ लाख ९४८ शेतकऱ्यांनी सहभाग नोंदवला आहे आणि १ लाख ०३ हजार ३६९ हेक्टर क्षेत्र विमा संरक्षणाखाली आणले गेले आहे. शेतकऱ्यांकडून हिस्सा म्हणून तब्बल ८७.६२ कोटी रुपये विमा कंपनीकडे जमा झाले आहेत. या मोठ्या आर्थिक व्यवहाराच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने पडताळणी प्रक्रिया अधिक काटेकोरपणे राबविण्याचे निर्देश दिले होते. त्या अनुषंगाने महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग ॲप्लिकेशन सेंटर (एमआरसॅक) (पान २ वर)

# रुपाली चाकणकरांवर कारवाई होणार?

## राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते खासदार प्रफुल्ल पटेल यांनी दिले संकेत

वृत्तसंस्था । नाशिक

**येथील भोंदूबाबा कॅप्टन अशोक खरात याचे काळे कारनामे उजेडात आले आहेत. या प्रकरणावरुन राज्यातील राजकीय वातावरण तापले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्या महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्यावर टीकेचा भडिमार केला जात असून, त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे.**



या सगळ्या प्रकरणावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते खासदार प्रफुल्ल पटेल यांनी प्रतिक्रिया दिली आहे. 'भोंदूबाबाचे जे काही प्रकार आहेत ते अतिशय वाईट आहे आणि घाणेरडे आहेत. त्याच्यावर सक्त कारवाई केली पाहिजे, आणि जे लोक त्यांच्या सोबत आहेत. त्यांच्यावर सुद्धा सक्तीने कारवाई केली पाहिजे. त्याचप्रमाणे या प्रकरणात काही राजकीय नेत्यांचे नाव जोडले गेले आहेत, त्यावर आम्ही राष्ट्रवादी (पान २ वर)

**चाकणकरांची नार्को टेस्ट करावी**

**रुपाली चाकणकरांचे फोटो दाखवत उद्धव सेनेच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी धक्कादायक आरोप केले आहेत. पत्रकार परिषद घेत सुषमा अंधारेंनी चाकणकरांचा राजीनामा घेऊन त्यांची नार्को टेस्ट करावी, अशी मागणी केली आहे. तसेच त्यांना या गुन्ह्याची माहिती आधीपासून होती, असा मोठा दावाही केला आहे.**

# सौदी अरेबियाने वर्तवले जगाला धडकी भरवणारे भाकीत

# युद्धामुळे कच्च्या तेलाचे भाव गगनाला भिडणार!

वृत्तसंस्था । रियाध

**पश्चिम आशियातील अमेरिका–इस्रायल आणि इराण यांच्यातील युद्ध धुमसत असल्यामुळे कच्च्या तेलाच्या व्यापारावर संकट उभे राहिले आहे.**

दोन दिवसांपासून ऊर्जा प्रकल्पावर हल्ले सुरू झाल्यामुळे कच्च्या तेलाचे दर प्रति बॅरल ११९ डॉलरवर पोहोचले होते. मात्र गुरुवारी सायंकाळी इस्रायल आणि अमेरिकेने ऊर्जा प्रकल्पांना लक्ष्य करणार नसल्याचे जाहीर करताच कच्च्या तेलाचे दर १०७ डॉलरपर्यंत खाली आले. मात्र सौदी अरोबियाने जगाला धडकी भरवणारे भाकीत वर्तवले आहे. आखाती देशातील संघर्ष एप्रिलमध्येही सुरू राहिला आणि होर्मुझ सामुद्रधुनी मोकळी झाली नाही तर कच्च्या तेलाच्या किमती प्रति बॅरल १८० डॉलरपर्यंत वाढू शकतात, असा अंदाज सौदी अरेबियाने वर्तवला आहे.

वॉल स्ट्रीज जर्नलने यासंबंधीचे वृत्त दिले आहे. सौदी अरेबियाच्या अधिकाऱ्यांनी युद्धाच्या सध्याच्या परिस्थितीचे विश्लेषण करून हा अंदाज वर्तविला आहे. आखाती प्रदेशातील सर्वात मोठ्या कच्च्या तेलाच्या उत्पादकांशी बोलून त्यांनी हा अंदाज व्यक्त केला आहे. सौदी अरेबियाच्या अधिकाऱ्यांनी (पान २ वर)



**२००८ सालची परिस्थिती ओढवेल?**
**यापूर्वी २००८ साली कच्च्या तेलाच्या किमती प्रति बॅरल १८० डॉलरवर गेल्या होत्या. त्याचवेळी इतर कारणांचीही भर पडली होती. ज्यामुळे जगाला आर्थिक मंदीचा फटका बसला होता.**

# इराणमध्ये कुस्तीपटूसह ३ तरुणांना फाशीची शिक्षा

वृत्तसंस्था । तेहरान

सालेह मोहम्मदीला इराणच्या कुस्ती जगतातील एक उदयोन्मुख तारा मानले जात होते. त्याने रशियामध्ये २०२४ साली झालेल्या सिटिएव्ह कपमध्ये कांस्य पदकही जिंकले होते. मात्र, त्याच्यावरील गंभीर आरोप आणि त्यानंतर सुनावलेल्या शिक्षेमुळे क्रीडा जगतात एक नवीन वाद निर्माण झाला आहे. इराणी अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, जानेवारी २०२६ च्या आंदोलनादरम्यान दोन पोलिसांच्या हत्येचा आरोप सालेह आणि इतर तिघांवर होता. या प्रकरणात, त्यांना मोहरेबेह (अर्थात देवाविरुद्ध युद्ध) आणि हत्येसाठी दोषी ठरवण्यात आले. या फाशीच्या शिक्षेमुळे इराणमध्ये तुरुंगात असलेल्या इतर खेळाडूंबद्दलची भीती आणखी वाढली आहे. अहवालानुसार, जानेवारी २०२६ मध्ये आंदोलने सुरू झाल्यापासून ६० हून अधिक खेळाडू आणि प्रशिक्षकांना ठार मारण्यात आले आहे किंवा त्यांना मृत्युदंडाची शिक्षा होण्याची शक्यता आहे.

# नवापूर कृषी विभागात २० लाख ५० हजारांचा जीएसटी घोटाळा

## निवृत्त कृषी उपसंचालकासह खासगी कर सल्लागारावर गुन्हा दाखल

प्रतिनिधी । नंदुरबार

**जिल्हा सध्या वेगवेगळ्या कारणांनी चर्चेत आहे. वाळू ठिय्यांच्या लागलेल्या बोलीत अमळथे येथील वाळू घाटाला शासनाच्या मूलभूत किमतीपेक्षा तब्बल नऊ पट अधिकची बोली लागल्याने जिल्हा अलिकडेच चर्चेत आला. नऊपट अधिकची किंमत मिळालेल्या अमळथे घाटात दडलय तरी काय? असा प्रश्न निर्माण झाला असताना आता जिल्ह्यास प्रसिध्दी मिळवून देणारे अजून एक प्रकरण उघड झाले आहे.**




नंदुरबार जिल्ह्याच्या कृषी विभागातील गैरव्यवहारांचे हे प्रकरण आहे. यामुळे नंदुरबार जिल्ह्यातील कृषी विभाग कशाप्रकारे गैरव्यवहारात अडकला हे, ते दिसून येत आहे. नवापूर तालुक्यात २० लाखांहून अधिकच्या जीएसटी रकमेचा अपहार झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी तत्कालीन कृषी उपसंचालक आणि एका खासगी कर सल्लागाराविरोधात नवापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. नवापूर येथील कृषी विभागामार्फत २०१८ ते २०२० या कालावधीत मृद आणि जलसंधारणाची विविध विकासकामे करण्यात आली होती. शासनाच्या नियमांनुसार या कामांवर वस्तू व सेवा कर (जीएसटी) भरणे आवश्यक होते. (पान २ वर)

➤ कृषी विभागाने अंतर्गत चौकशी केल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. त्यानंतर विद्यमान तालुका कृषी अधिकाऱ्यांनी नवापूर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी दोन्ही संशयितांविरोधात गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे. दरम्यान, या प्रकरणामुळे नंदुरबार जिल्ह्यातील कृषी विभागाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून इतर योजनांमध्येही अशाच प्रकारचे गैरव्यवहार झाले आहेत का, याची सखोल चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे.

# मालाडमध्ये बांधकामाच्या खड्ड्यात पडून आठ वर्षीय मुलाचा मृत्यू

वृत्तसंस्था । मुंबई

**मालाड पूर्व येथील कुरार गाव परिसरात बांधकामाच्या खड्ड्यात पडून एका ८ वर्षांच्या मुलाचा मृत्यू झाला. आंबेवाडी येथील छगन पटेल चाळ येथे बांधकामासाठी खोदलेल्या आणि पाण्याने भरलेल्या खड्ड्यात हा मुलगा पडल्याने ही दुर्घटना घडली.**

गुरुवारी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास ही दुर्घटना घडली. दिव्यांश राजेश मौर्य (८) हा मुलगा खेळताना चेंडू आणण्यासाठी तिथे गेला असता तो खड्ड्यात पडला.



बांधकाम विकासकाने इमारतीच्या पुनर्बांधणीसाठी हा खड्डा खोदला होता. घटनेनंतर पोलिसांनी तात्काळ धाव घेत मुलाला बाहेर काढून डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय येथे दाखल केले. मात्र, रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्याला मृत घोषित केले. या प्रकरणी कुरार गाव पोलिस ठाण्याकडून पुढील तपास सुरू आहे.

## संपादकीय

# दबाव वाढतोय

खाडी युद्धात अडकलेल्या कोणत्याही भारतीयाला वाऱ्यावर सोडले जाणार नाही, असे म्हणणाऱ्या सरकारवर विश्वास आहे व सरकार ते कर्तव्य चोख बजावेलही याबाबत शंका नाही. प्रश्न आहे तो आता देशांतर्गत जी समस्या निर्माण होणार आहे. विशेषत: स्वयंपाकाच्या गॅसची त्याबाबत सरकार काय करू शकणार आहे याचा. केवळ बोलून अथवा सांगून अथवा दिलासा देऊन संपवता येण्यासारखा हा विषय नाही याची सरकारलाही कल्पना आहे. दिवसागणिक युद्धाच्या वातावरणामुळे जी अनिश्चितता वाढत चालली आहे त्याची छाया आता केवळ सरकारमधील लोकांच्याच नव्हे, तर सर्वसामान्यांच्याही चेहऱ्यावर उमटताना दिसते आहे. संघर्ष लवकरच मिटला नाही आणि इंधनपुरवठ्याची साखळी पूर्ववत सुरू झाली नाही तर काय ही ती चिंता आहे. तसे झालेच तर पर्यायी व्यवस्था आणि उपाय काय आहेत हे अजुनही अनुत्तरित आहे. देशात कशाचीच कमतरता नसल्याचे सांगण्यात येते आहे. पण बहुतेक महानगरांमधील चित्र पुरेसे बोलके आहे. अनेक ठिकाणी व्यावसायिक गॅसचा पुरवठा थांबला आहे. त्यांच्याकडे जी तजवीज होती त्यावर त्यांनी आजपर्यंतचे म्हणजे आठ–दहा दिवस ढकलले. पुढे काय हा प्रश्न हॉटेल व्यावसायिकांसमोर आहे. पेट्रोलियम मंत्रालयाने एलपीजीचे उत्पादन वाढवण्याचे निर्देश दिले आहेत. रशियाकडून तीन कोटी बॅरल कच्चे तेल खरेदी केले गेले आहे. अर्थात या मागच्या आठवड्यातील घडामोडी आहेत. त्यानंतर तीन जहाजे भारताच्या गुजरातमध्ये दाखल झाली असली तरी हे फार आश्वासक असल्याचे आज म्हणता येऊ शकत नाही. होर्मुझ सामुद्रधुनी बंद असल्यामुळे अन्य मार्गानेही तेल मागवण्याचा प्रयत्न केला जातो आहे. इतरही धावपळ सुरू असली तरी एक गोष्ट समजण्यासारखी आहे की युद्धाची व्याप्ती ज्या प्रमाणात वाढली आहे त्याचा प्रभाव कुठल्या न कुठल्या स्वरूपात पडणार आहेच व त्याची झळही सोसावी लागणार आहे. भारतासारखे जे देश आपल्या गरजेच्या ८० टक्क्यांपेक्षा जास्त आयातीवरच अवलंबून आहेत त्यांच्यासाठी हा परीक्षेचाच काळ आहे. आता आत्मनिर्भर होण्याच्या केवळ चर्चा करून भागणार नाही, तर भविष्यासाठी तजवीज करण्याकरता पुढाकारही घ्यावा लागेल. सरकार खुलेपणाने मान्य करत नसले अथवा करू शकत नसले तरी चिंतेच्या रेषा चेहऱ्यावर दिसू लागल्या आहेत. केंद्राच्या सूचनेनुसार शुद्धीकरण प्रकल्प आपल्या पूर्ण क्षमतेने काम करत आहेत. असे असूनही गॅसचे संकट आवाक्यात अथवा आटोक्यात आलेले नाही. संकटात पोळले जाणाऱ्यांचा जसा एक वर्ग असतो तसा त्याच काळात आपली पोळी भाजणाऱ्यांचाही म्हणजे संकटाचाही व्यापार करणारा एक वर्ग असतो. अनिश्चिततेच्या काळात त्यांचे फावतेच. पुरवठा सुरळीत राहावा यासाठी आवश्यक नियम लागू केले गेले आहेत. तथापि, ठिकठिकाणी छापेही टाकले जात आहेत व मोठ्या प्रमाणावर सिलिंडर जप्त होताना दिसत आहेत. याचाच अर्थ काळाबाजार सुरू आहे व त्याला रोखण्यात यश आले नाही किंवा तो करणाऱ्यांना अद्याप जरब बसलेली नाही. लहान हॉटेल्स, ढाबे, छोटे स्टॉल अगदी क्वचितच सुरू दिसत आहेत किंवा मेनू बदलून सुरू ठेवले जात आहेत. यामुळे केवळ खवय्यांची गैरसोय होईल व त्यांनी काही दिवस जिभेचे चोचले थांबवावे असे म्हणून हा विषय फेटाळता येत नाही त्याचे कारण हॉटेल व्यवसायाशी निगडीत लाखो लोक आणि त्यांचे कुटुंब आहेत व ते पोळले जात आहेत. ज्यांचा पूर्ण वेळ रोजगारच हा आहे. त्यांच्या रोजगारावर तर संकट आहेच, उपासमारीचे संकटही त्यांच्यासमोर आहे. पश्चिम आशियातील संघर्ष संपला असा सकारात्मक विचार करायचा झाल्यास सगळे पूर्वपदावर येण्यास काही काळ लागू शकतो. इराणने केवळ होर्मुझचा मार्ग खुला केला किंवा त्यांना करावा लागला तरी सगळे तिथेच संपत नाही. मात्र त्याचा सामना करत आता भविष्याचा विचार करत मार्गही काढावे लागतील.

# गुढीपाडवा शोभायात्रेत हिंदू संस्कृतीचे घडविले दर्शन

## घरोघरी, चौका–चौकांमध्ये पारंपरिक पध्दतीने गुढीचे पूजन; बाजारपेठेत कोट्यवधींची उलाढाल

प्रतिनिधी । धुळे

**साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेल्या गुढीपाडवा सणानिमित्त गुरुवारी शहरभर चैतन्याचे वातावरण दिसून आले. घरोघरी व प्रमुख चौकाचौकात गुढ्या उभारून गुढी व प्रभू श्रीरामाच्या प्रतिमेचे विधीवत पूजन करण्यात आले. यावेळी विश्व हिंदू परिषदेतर्फे शहरातून भव्य शोभायात्रेव्दारे हिंदू नववर्षाचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. जिवंत देखावे आणि ढोल–ताशे, डमरू पथकाच्या गजरात काढलेल्या या शोभायात्रेने धुळेकरांचे लक्ष वेधून घेतले.**





गुढीपाडवानिमित्त खान्देश कुलस्वामिनी एकवीरा देवी मंदिरापासून शोभायात्रेला सकाळी सुरुवात झाली. महापौर मायादेवी परदेशी, आ. मंजुळा गावित, जि.प.च्या माजी अध्यक्षा देवरे यांच्या हस्ते देवीची आरती करून शोभायात्रेचा शुभारंभ झाला. जय श्रीरामाच्या जयघोषात ही शोभायात्रा नेहरू चौक, पंचवटी, मोठा पूल, नगरपट्टी, राजकमल मार्गे आग्रा रोडवरील श्रीराम मंदिरात पोहोचली, तेथे आरतीने समारोप झाला. शोभायात्रेच्या निमित्ताने आज सर्व राजकीय पक्षांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते एकत्र आले. यावेळी त्यांनी आपापसात संवाद साधत हिंदू नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या. माजी महापौर जयश्री अहिरराव, प्रदीप कर्पे, अल्पा अग्रवाल, डॉ. तुळशीराम गावित, हिलाल माळी, हिरामण गवळी, विजय पाच्छापुरकर, शितल नवले, उमेश चौधरी, ओम खंडेलवाल, अतुल सोनवणे, माजी आ. शरद पाटील, नगरसेवक धिरज कलंत्री, गुलाब माळी, कैलास चौधरी, प्रकाश पोळ, विनोद खेमनार, भगवान गवळी, सचिन पाटील, सचिन मराठे, डॉ. सुशिल महाजन, शांताराम नेरकर, रोहित चांदोडे, पृथ्वीराज पाटील, मोहित देसले, राजेंद्र चितोडकर, योगीराज मराठे, निलेश रुणवाल, निफाडकर गुरुजी, विजय पाच्छापूरकर, भरत देवळे, नानासाहेब हालोर, विनोद सोमानी, किशोर चौधरी, प्रितेश अग्रवाल, उमेश चौधरी, जयवंत वानखेडकर, डॉ. निशा महाजन, महादेव परदेशी, दीपक भागवत, संजय बोरसे, पराग अहिरे, प्रफुल्ल पाटील आदी उपस्थित होते. शोभायात्रा मार्गावर देवपूर व आझादनगर पोलिसांचा चोख बंदोबस्त तैनात होता. उपविभागीय पोलिस अधिक्षक राजकुमार उपासे, देवपूरचे पोलिस निरीक्षक समाधान वाय, आझादनगर निरीक्षक निवृत्ती पवार व अधिकारी, कर्मचारी लक्ष ठेवून होते. गुढीपाडव्याच्या सोने खरेदीतून दिवसभर वा मंगलदिनी धुळेकरांनी उत्साहात नववर्षाचे स्वागत करत बाजारपेठेपासून धार्मिक कार्यक्रमांपर्यंत सर्वत्र आनंदमय वातावरण निर्माण केले. दरम्यान, गुढीपाडव्याचा शुभमुहर्त असल्याने शहरातील बाजारपेठांमध्ये मोठी उलाढाल दिसून आली. सोने खरेदीला विशेष महत्व असल्याने अनेकांनी सोने खरेदी केली. भाव गगनाला भिडलेला असला तरी नागरिकांनी मुहूर्त म्हणून तुकडा खरेदी केली. सहा ते सात कोटींची उलाढाल होण्याची अंदाज व्यावसायीकांनी व्यक्त केला आहे. दुसरीकडे मोबाईल, इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंच्या शोरूममध्ये मोठी गर्दी दिसली. गुढीपाडव्याच्या शुभमुहुर्तावर ग्राहकांसाठी विशेष ऑफर देण्यात आलेल्या होत्या. त्यामुळे एसी, कुलर, टीव्ही, डबल डोअर फ्रिज, वॉशिंग मशीन, मायक्रोओव्हन, मोबाईल, स्मार्ट वॉच, लॅपटॉप, होम थिएटर यासारख्या वस्तूंची मोठ्या प्रमाणावर खरेदी होतांना दिसून आली. मात्र कपडे खरेदीकडे ग्राहकांनी काहीशी पाठ फिरविल्याचे दिसून आले. इलेक्ट्रॉनिक्स बाजारात खरेदीतून सुमारे १३५ कोटींची उलढाल होण्याचा अंदाज वर्तविण्यात आला. इले. दुचाकींचा पसंती गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर शहरातील विविध कंपन्यांच्या शोरूममधून ९०० वर दुचाकी आणि २५० पेक्षा अधिक चारचाकी वाहने विकली गेली. त्यामध्ये इलेक्ट्रिक वाहनांचाही मोठा समावेश होता. आकर्षक व्याजदर आणि सहज मिळणाऱ्या कर्जामुळे अनेकांनी वाहन खरेदीला प्राधान्य दिले. या एकवीरा देवी मंदिरात गुढी पाडव्यानिमित्त खानदेश कुलस्वामिनी एकवीरा देवी मंदिर येथे गुढी उभारण्यात आली. गुढीचे पूजन पारंपारिक पध्दतीने कृषी अधिकारी नयन बेहेरे व कोमल बेहेरे यांनी केले. यावेळी मंदिराचे मुख्य ट्रस्टी सोमनाथ गुरख, निलेश नंदन, चंद्रशेखर गुख, धनंजय भंडारी, दत्तात्रय शिंदे, रंगा मद्रासी आदींसह मान्यवर उपस्थित होते. दुचाकी व चारचाकी वाहन विक्रीतून सुमारे २० कोटीवर उलाढाल झाली. शुभमुहूर्तावर अनेकांकडून नवीन घर, फ्लॅटची खरेदी करीत गृहप्रवेश करण्याकडे कल दिसून आला. यंदा शहरात केवळ ७० ते ८० घर, फ्लॅट आणि रो– हाऊसचे व्यवहार झाले. त्यातील अनेकांनी गृहप्रवेश केला.

> शोभायात्रेत श्री संत शिरोमणी सावता महाराजांचे १९ वे वंशज हभप सावता महाराज वसेकर यांच्यासह अनेक संत, महत आणि हिंदू बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. शोभायात्रेत आकर्षक जनजागृतीपर देखावे, धार्मिक व प्रेरणादायी विषयावर सादरीकर करण्यात आले. उज्ञैन येथील डमरू पथक, सोनगीर व वरणगाव डोल–शोर्य पथके, वारकरी संप्रदाय सहभागी झाले होते. शोर्य पथकाच्या चित्तथरारक कसरतीने लक्ष वेधून घेतले. मार्गभर भगवे ध्वज लावण्यात आले होते. चौकाचौकात आकर्षक रांगोळ्या काढल्या होत्या आणि पुष्पवृष्टी करत शोभायात्रेचे स्वागत करण्यात आले. सहभागी बांधवांनी भगवी टोपी आणि रूमाल परिधान केले होते.

# नंदुरबारमध्ये जिल्हास्तरीय शांतता समिती बैठक

प्रतिनिधी । नंदुरबार

**आगामी सण–उत्सवांच्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनातर्फे जिल्हास्तरीय शांतता समिती बैठक घेण्यात आली.**



गुढीपाडवा, रमजान ईद, श्रीराम नवमी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती व इतर असे महत्वाचे सण–उत्सव शांततेत पार पडून जिल्हयात कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी यासाठी जिल्हा प्रशासनातर्फे जिल्हाधिकारी कार्यालय जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय शांतता समिती बैठकीचे आयोजन जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन भवन सभागृहात करण्यात आले होते. सदर बैठक पोलीस अधीक्षक श्रवण दत्त. एस यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. जिल्हयाभरातील विविध ठिकाणांहून शांतता समितीचे १०० ते १५० सदस्य तसेच प्रतिष्ठित नागरिक व विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीत विशेषतः आगामी सण–उत्सवांचे अनुषंगाने जिल्हयात कायदा व सुव्यवस्था कायम ठेवण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना राबविण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. सदर बैठकीत जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त. एस, उपजिल्हाधिकारी धनंजय गोपटे, निवासी उपजिल्हाधिकारी आशा गांगुर्डे, उपविभागीय पोलीस अधिकारी संजय महाजन, दत्ता पवार, सुभाष भोये, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमत पाटील तसेच जिल्हयातील सर्व पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी व इतर प्रशासकीय अधिकारी या बैठकीला उपस्थित होते.

# जागतिक महिला दिनानिमित्त उद्या जिल्ह्याभरातील महिलांसाठी अनोखा कार्यक्रम

प्रतिनिधी । जळगाव

**जागतिक महिला दिनानिमित्त जळगाव शहरात महिलांसाठी एक विशेष आणि बहुपयोगी कार्यक्रम आयोजित करण्यात येत असून स्वप्न साकार फाउंडेशन संचलित अग्नीशीखा महिला ग्रुपच्यावतीने पहिल्यांदाच हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. येत्या २२ मार्च रोजी जळगाव येथे मान्यवरांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम उत्साहात पार पडणार असल्याची माहिती झालेल्या पत्रकार परिषदेत अग्निशिखा महिला ग्रुपच्या संस्थापक अध्यक्ष भारती काळे यांनी दिली.**

महिलांच्या आरोग्य, सुरक्षितता आणि सशक्तीकरणाच्या दृष्टीने विविध विषयांवर तज्ज्ञांकडून मार्गदर्शन, वाढते सायबर क्राईम या विषयावर मार्गदर्शन करून महिलांनी सोशल मीडियाचा वापर करताना कोणती काळजी घ्यावी, याशिवाय महिलांच्या आरोग्याशी संबंधित महिन्याला येणाऱ्या समस्यांबाबत (मासिक पाळी व इतर आरोग्य विषय) तज्ज्ञ डॉक्टरांकडून विशेष चर्चासत्र, व्यसनमुक्तीपर जाहीर कीर्तन आयोजित करण्यात आले असून समाजातील व्यसनाधीनतेबाबत जनजागृती करण्याचा संदेश या माध्यमातून दिला जाणार आहे. डॉ. निलेश चांडक, डॉ. सीमा पाटील, डॉ. पूजा सोमानी,डॉ. प्राची महाजन, डॉ. नितीन विसपुते, डॉ. अविनाश खेलवाडे, प्रा. वासुदेव पाटील, डॉ. श्रद्धा राणे, डॉ. शीतल पाटील, जागृती येवले, तृप्ती कांकरिया, युगंधरा सोळुंके, डॉ.अवधूत चौधरी,डॉ. रुकसाना खान यांना अग्नि शिका महिला ग्रुपच्या वतीने खान्देश रत्न पुरस्काराने येत्या रविवारी सन्मानित करण्यात येणार आहे.

## पान १ वरुन

**अस्पृश्यता, विषमता......**

त्यामुळे आपल्या देशात पुन्हा अशी विषमता येऊ नये यासाठी काम झाले आहे. अस्पृश्यता व विषमता हा सर्वात मोठा अपराध आहे. त्यामुळे येणाऱ्या पीढ्यांना समता व विषमतेने झालेले नुकसान या दोन्ही गोष्टी कळल्या पाहिजेत. म्हणून आजचा दिवस महत्त्वाचा आहे. या प्रकरणी केवळ जलशुद्धीकरणाचा विकास नव्हे तर सर्वांगीण विकास करण्यावर आमचा प्रयत्न आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले.

**रुपाली चाकणकरांवर......**

पक्षाकडून योग्य कार्यवाही करणार आहे आणि ते येणाऱ्या काळात दिसेल, अशी प्रतिक्रिया प्रफुल्ल पटेल यांनी दिली आहे. पटेलांनी या विधानातून रुपाली चाकणकरांवर कारवाईचे संकेत दिले आहेत.

**जळगाव तालुक्यात ११......**

यांच्या माध्यमातून उपग्रह प्रतिमा आणि डिजिटल नकाशांच्या साहाय्याने जळगाव, मुक्ताईनगर, यावल, रावेर, चोपडा, धरणगाव आणि जामनेर या सात तालुक्यांतील जास्त विमा क्षेत्र असलेल्या भागांची तपासणी करण्यात आली. या तांत्रिक पडताळणीत गंभीर अनियमितता उघडकीस आली. तपासलेल्या ९१ हजार ८८० शेतकऱ्यांच्या ९६ हजार १५७.२० हेक्टर क्षेत्रापैकी केवळ ५० हजार २११.३३ हेक्टर क्षेत्रावरच प्रत्यक्ष केळी पीक आढळले. उर्वरित ४५ हजार ९४५.८७ हेक्टर क्षेत्रावर केळी नसल्याचे स्पष्ट झाले. ज्यामुळे विमा प्रक्रियेतील गैरप्रकारांबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. जळगाव तालुका, १०.८८ लाखांची फसवणूक – जळगाव तालुक्यात सुमारे ९०११ शेतकऱ्यांनी ९०३९.४५ हेक्टरवरील केळी पिकाचा विमा सीएससी केंद्रांच्या माध्यमातून उतरविला होता. महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग ॲप्लिकेशन सेंटर (एमआरसॅक) द्वारे तपासणी केली असता, त्यापैकी ५३५०.१३ हेक्टर क्षेत्रावर केळी लागवड आढळून आलेली नाही. तसेच ४२१९ अर्जदारांच्या क्षेत्रावर विमा संरक्षित क्षेत्रापेक्षा प्रत्यक्षात कमी क्षेत्र आढळून आले. अहवालानुसार विमा संरक्षित क्षेत्रापैकी सुमारे ५९.१८ टक्के क्षेत्रावर केळी लागवड नसल्याचे आणि लागवडीच्या तुलनेत जास्त क्षेत्रावर विमा संरक्षण घेतल्याचे प्रथम दर्शनी दिसून आले आहे. दरम्यान, केळी पिकाची लागवड नसताना ज्या सीएससी केंद्रांवरुन शेतकऱ्यांनी अर्ज सादर केले आहेत, त्या आठ केंद्र चालकांवरही आता कायदेशीर कारवाई करण्याचे पाऊल उचलले गेले आहेत. जळगाव तालुका कृषी अधिकारी स्नेहल थेऊरकर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन तालुका पोलीस ठाण्यात सुमारे १० कोटी ८८ लाख रुपयांची फसवणूक केल्याच्या आरोपावरुन एकूण आठ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहे. या सीएससी केंद्र चालकांवर झाले गुन्हे दाखल – अनिल अशोक पवार, किशोर शांताराम सोनवणे, महेंद्र अरुण बडगुजर (तिन्ही रा. भोकर, ता. जि. जळगाव), खुशाल धनराज पाटील, केतन जगदीश सोनवणे (दोन्ही रा. किनोद, ता. जि. जळगाव), दीपाली प्रशांत पाटील (रा. सावखेडा खुर्द, ता. जि. जळगाव), रवींद्र हरचंद सपकाळे (रा. भादली खुर्द, ता. जि. जळगाव), भरत अरविंद चव्हाण (रा. कानळदा, ता. जि. जळगाव)

**युद्धामुळे कच्च्या तेलाचे......**

वर्तवलेल्या अंदाजानुसार, जर कच्च्या तेलाचे दर १८० डॉलरवर गेले तर जागतिक बाजारासाठी हो मोठा झटका ठरेल. दर वाढले तरी सौदी अरेबियाला चिंता का? – कच्च्या तेलाचे दर वाढल्यानंतर सौदी अरेबियासारख्या तेल उत्पादक देशांचा नफा होतो. तरीही कच्च्या तेलाचे दर वाढण्याची सौदी अरेबियाला चिंता वाटत आहे. याचे कारण म्हणजे कच्च्या तेलाचे दर गगनाला भिडल्यास अनेक देश नवीकरणीय ऊर्जेकडे (रिनिव्हेबल एनर्जी) वळतील. ज्यामुळे भविष्यात तेलाची मागणी कमी होत जाईल. तसेच तेलाच्या किंमती वाढल्यामुळे वैश्विक मंदीचाही धोका उद्भवतो.

**नवापूर कृषी विभागात २०......**

त्यासाठी तालुका कृषी कार्यालयाने ३० लाख ३३ हजार १७० रुपयांचा धनादेश संबंधित अधिकाऱ्यांकडे सुपूर्द करून जीएसटी भरावा, असे निर्देश दिले होते. तथापि, तपासादरम्यान समोर आलेल्या माहितीनुसार तत्कालीन कृषी उपसंचालक वसंत धर्मराज चौधरी आणि कर सल्लागार राकेश भालचंद्र कोठावदे यांनी केवळ ९ लाख ८३ हजार २२ रुपयेच शासनाकडे ई–पेमेंटद्वारे जमा केले. उर्वरित २० लाख ५० हजार १४८ रुपयांचा अपहार केल्याचे उघड झाले. विशेष म्हणजे हा आर्थिक गैरव्यवहार लपवण्यासाठी संशयितांनी मृत लिपिकाच्या नावाने बनावट देयक तयार केले. त्यावर खोट्या स्वाक्षरी करून कागदपत्रे सादर करण्यात आल्याचा गंभीर प्रकारही चौकशीत उघड झाला आहे. त्यामुळे या प्रकरणाची व्याप्ती अधिकच वाढली असून हा प्रकार नियोजनपूर्वक केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

# वनवासी विद्यालयात एक घर चिमणीला उपक्रम

प्रतिनिधी । नवापूर

जागतिक चिमणी दिनानिमि त्त वनवासी विद्यालयात एक घर चिमणीला हा उपक्रम उत्साहात राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना नारळाच्या करवंट्यांपासून चिमण्यांसाठी घरटी तसेच पाणी व दाणे ठेवण्याची साधने तयार करण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. या कार्यशाळेत इयत्ता ८ वीतील सुमारे विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रमोद चिंचोले होते. अतिथी म्हणून प्रेमल पाडवी, ज्येष्ठ शिक्षक आर. आर. गायकवाड, एस.एस.कपाडिया व आर.डी.सोनवणे उपस्थित होते. कार्यक्रमाची प्रस्तावना एस.व्ही.आहेर यांनी केली. सूत्रसंचालन सृष्टी वळवी हिने केले. इ ७ वी च्या विद्यार्थिनींनी चिमणी गीत सादर केले. प्रमुख वक्ते मंगेश देवरे यांनी चिमण्यांच्या संवर्धनाविषयी महत्त्व पटवून दिले.

# रंगावलीतून वाढीव पाण्याच्या हक्कास मंजुरी

## नवापुरकरांना दिलासा, आ. चंद्रकांत रघुवंशी, भरत गावितांच्या प्रयत्नांना यश

प्रतिनिधी । नवापूर

पाणीटंचाईवर उपायासाठी येथील रंगावली प्रकल्पातून वाढीव पाण्याच्या हक्कास मंजुरी देण्यात आली आहे. आ. चंद्रकांत रघुवंशी व भरत गावीत यांच्या प्रयत्नांना यश आले आहे. त्यामुळे नवापूरकरांना दिलासा मिळाला आहे. महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान अंतर्गत नवापूर नगरपरिषद पाणीपुरवठा योजनेस मोठा दिलासा मिळाला असून, रंगावली मध्यम प्रकल्पातून वाढीव बिगर सिंचन पाण्याच्या हक्कास राज्य शासनाने मंजुरी दिली आहे. आ. चंद्रकांत रघुवंशी तसेच राष्ट्रवादी अजित पवार गटाचे ज्येष्ठ नेते भरत गावीत यांच्या प्रयत्नांना यश मिळाले आहे. जलसंपदा विभागाच्या शासन निर्णयाद्वारे ही महत्त्वपूर्ण घोषणा करण्यात आली आहे. या निर्णयानुसार नवापूर (जि. नंदुरबार) येथील पाणीपुरवठा योजनेसाठी रंगावली मध्यम प्रकल्पातून ०.८६६१ दलघमी इतका वाढीव पाण्याचा हक्क म जूर करण्यात आला आहे. भविष्यातील वाढती लोकसंख्या, विशेषतः सन २०५८ पर्यंतचा विचार करून ही मंजुरी देण्यात आल्याचे शासनाने स्पष्ट केले आहे. तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव यांच्या प्रस्तावानुसार हा निर्णय घेण्यात आला असून शहरातील नागरिकांना सुरक्षित व पुरेसा पाणीपुरवठा सुनिश्चित करण्यासाठी हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. शासनाने दिलेल्या मंजुरीस काही अटीही लागू करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये पिण्याच्या पाण्यासाठी सिंचन पुनर्स्थापना खर्च माफ करणे, करारनामा नियमानुसार करणे, पाणी वापराचे टप्प्याटप्प्याने नियोजन करणे तसेच जलप्रदूषण टाळण्यासाठी नियमांचे पालन करणे यांचा समावेश आहे. याशिवाय, मंजूर पाण्याचा वापर पुढील वर्षांच्या आत सुरू करणे बंधनकारक असून, तसे न केल्यास पाणी आरक्षण आपोआप रद्द होणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

# पहिल्या बाल मराठी संमेलनात नंदुरबारच्या चिमुकल्यांचा डंका!

## विद्यार्थ्यांनी परिधान केलेल्या पारंपरिक वेशभूषेमुळे मुंबईकरांचे वेधले लक्ष

प्रतिनिधी । नंदुरबार

**तालुक्यातील कोठली खु. येथील जिल्हा परिषद आदर्श केंद्र शाळेने महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागातर्फे आयोजित बाल मराठी संमेलनांतर्गत आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग नोंदवला.**



महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागाच्या वतीने दि. १६ व १७ मार्च बाल मराठी संमेलन–२०२६ आयोजित करण्यात आले होते. या दोन दिवसीय संमलनाचे उद्घाटन नवी मुंबईतील सिडको प्रदर्शन केंद्र, वाशी (साने गुरुजी बालनगरी) येथे राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी नवी मुंबई महापालिकेच्या महापौर सुजाता पाटील, उपमहापौर दशरथ भगत, स्थायी समिती अध्यक्ष अशोक पाटील, विरोधी पक्षनेते विजय चौघुले, आरोग्य समिती सभापती डॉ.नाथ, नगरसेविका शोभना गावडे, मराठी भाषा विभागाचे प्रधान सचिव डॉ.किरण कुलकर्णी, राज्य मराठी विकास संस्थेचे संचालक डॉ. शामकांत देवरे, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष डॉ. रविंद्र शोभणे, प्रसिध्द सुलेखनकार पद्मश्री अच्यूत पालव, मराठी चित्रपट सृष्टीतील प्रसिध्द दिग्दर्शक, लेखक व अभिनेता महेश कोठारे, जेष्ठ साहित्यिक डॉ. सदानंद मोरे, जेष्ठ बालनट्यकर्मी प्रतिभा मतकरी, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील, ज्येष्ठ नाट्यकर्मी सुप्रिया विनोद आदी उपस्थित होते. या बाल मराठी संमेलनाच्या अनुषंगाने भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या शोभायात्रेत देखील नंदुरबार तालुक्यातील कोठली खुर्द येथील जिल्हा परिषद आदर्श केंद्र शाळेच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांनी परिधान केलेल्या पारंपारिक वेशभूषेमुळे सर्व नवीन मुंबईकरांचे लक्ष वेधले होते. उद्घाटनानंतर आयोजित मुख्य रंगमंचावरील सांस्कृतिक कार्यक्रमात महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील चमुने सहभाग नोंदवला. या मुख्य रंगमंचावरील कार्यक्रमात जिल्हा परिषद आदर्श केंद्र शाळा कोठली खुर्द येथील विद्यार्थ्यांनी आपल्या कलेचा अविष्कार सादर करून सर्वांना प्रभावित केले.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक – सागर काशिनाथ ओतारी **(मोबा.– ९९७००५३०६६)** व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी –३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव –४२५००१ येथे छापून शॉप नं. ई–१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव– ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
**✲ कार्यकारी संपादक – किशोर शंकर शिंपी** (✲ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७–२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# भारत शेतीच्या क्षेत्रात आत्मनिर्भर होऊन प्रगत राष्ट्रांच्या यादीत जाऊन बसेल

## जैन हिल्सच्या भेटीप्रसंगी केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांचा विश्वास

प्रतिनिधी । जळगाव

**फळे, फुले व भाजीपाला या पिकांबरोबरच भात, गहू, मका, सोयाबीन, तूर, कापूस आणि कडधान्ये व तेलबियांची पिके ठिबक संचाच्या सहाय्याने घेतल्यास उत्पादन व उत्पादकतेत प्रचंड वाढ होऊन भारत शेतीच्या क्षेत्रात आत्मनिर्भर होऊन प्रगत राष्ट्रांच्या यादीत जाऊन बसेल,असा विश्वास केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी व्यक्त केला. विविध पिकांची जळगावच्या जैन हिल्सवरील प्रात्यक्षिके पाहून केंद्रीय कृषीमंत्री चौहान यांनी माहिती समजून घेतली.**



ना.चौहान यांनी आज जैन इरिगेशन कंपनीच्यावतीने जैन हिल्सवर आधुनिक तंत्रज्ञानाने फळबागा व अन्य जी विविध पिके प्रात्यक्षिक म्हणून उभी करण्यात आलेली आहेत त्यांची पाहणी केली. जैन इरिगेशन कंपनीचे चेअरमन अशोक जैन यांनी त्यांचे स्वागत केले. मागील वीस वर्षांपासून जैन हिल्सवर ठिबक संचाच्या आधाराने भाताचे पीक घेतले जाते आहे. ठिबकवर भाताचे पीक येऊच शकत नाही,असा बहुसंख्य शेतकऱ्यांचा समज असून तसा प्रश्नही ना.चौहान यांनी उपस्थित केला व या प्रयोगाबद्दल आश्चर्यही व्यक्त केले. मागील चौदा वर्षातील भाताच्या ठिबकवरील प्रयोगांची माहिती दिल्यानंतर प्रवाही व पाटाने दिलेल्या पाण्यापेक्षा ठिबकवरील भाताचे उत्पादन कितीतरी अधिक येऊन दाणा उत्तम पोसला जातो आणि पिकाची अनावश्यक वाढ रोखली जाऊन ते आडवे पडत नाही,असे कंपनीच्या शास्त्रज्ञांनी निदर्शनास आणून दिले. तेव्हा यापुढील काळात भात पिकविणाऱ्या राज्यांमध्ये ठिबक संचावर भात उत्पादनाला प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने प्रयत्न करू,असे आश्वासन ना.चौहान यांनी दिले.

### ➢ तंत्रज्ञानावर आधारित शेतीची कास धरा

**कंपनीच्या वतीने राबविल्या जाणाऱ्या विविध प्रकल्पांची यावेळी मंत्री महोदयांना माहिती देण्यात आली. आधुनिक सिंचन तंत्रज्ञान, जलव्यवस्थापन, फ्युचर फार्मिंग आणि विज्ञान व तंत्रज्ञानावर आधारित शेतीची कास धरली तरच आपला देश प्रगतीच्या दिशेने जाऊ शकेल, असा ठाम विश्वास ना. शिवराजसिंह चौहान यांनी व्यक्त केला.**

भाताबरोबरच हळद, आले, जैन स्वीट ऑरेंज, डाळिंब, आंबा व जैन संत्रा यांची नवीन तंत्रज्ञानाचा व टिश्यूकल्चरचा वापर करून उत्तम, सकस, दर्जेदार रोगमुक्त व व्हायरस फ्री रोपे कलमे जैन इरिगेशन कंपनी कशी तयार करते याची कृषिमंत्र्यांनी पाहणी करून माहिती घेतली. ग्रीनहाऊसमध्ये वाढविलेल्या केळी बागेला समक्ष त्यांनी भेट देऊन यासंबंधीचा व्हिडीओही त्यांनी स्वतःच्या आवाजात व्हायरल केला. हवामान बदल आणि तापमान वाढीच्या संकटातून शेतकऱ्यांना वाचवायचे असेल तर बंदिस्त व नियंत्रित वातावरणात म्हणजे ग्रीनहाउस, पॉलिहाऊस, शेडनेटमध्ये क्लायमेट स्मार्ट तंत्रज्ञानाचा वापर करून विविध प्रकारची पिके कशी घेतली पाहिजेत यासंबंधी सविस्तर चर्चा झाली. सिक्स इन वन तंत्रज्ञान उष्ण वातावरणात ऊसासारख्या पिकाला कसे उपयोगी पडून उपादन वाढते हे देखील त्यांनी जैन हिल्सवर अनुभवले. उष्ण व कोरड्या वातावरणात काळी मिरीचे पीक कसे सुंदर येते आणि हायड्रोपोनिक्स, एरोपोनिक्स, व्हर्टिकल फार्मिंग व क्लायमेट न्यूट्रल आलू टयूबर (बटाटा बियाणे) कसे तयार होते व शेतकऱ्यांसाठी ते कसे फायदेशीर ठरते याचे प्रात्यक्षिकही ना. चौहान यांनी जैन हिल्सवर पाहिले. या भेटीच्यावेळी ना.चौहान यांच्या समवेत केंद्रीय युवक व्यवहार आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे, खासदार स्मिता वाघ, आमदार राजूमामा भोळे, राष्ट्रीय केळी संशोधन केंद्राचे संचालक डॉ.आर.सेल्व्हराजन,भारतीय कृषी अनुसंधान परिषदेचे (फलोद्यान) अतिरीक्त महासंचालक डॉ.बी. व्ही.पटेल, राज्याचे फलोद्यान संचालक अंकुश माने, नॅशनल हॉर्टिकल्चर बोर्डाचे डॉ.विजय दोहरे, सहसचिव प्रियरंजन दास, जिल्हाधिकारी रोहन घुगे आदी उपस्थित होते. मंत्र्यांसमवेत झालेल्या चर्चेमध्ये जैन इरिगेशनचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक अनिल जैन, सह-व्यवस्थापकीय संचालक अजित जैन व अतुल जैन, डॉ.के.बी.पाटील, डॉ.बी.के.यादव, डॉ.अनिल ढाके, डॉ.अनिल पाटील व बी.डी.जडे यांनी भाग घेतला होता.

## थोडक्यात

### चाकणकरांविरुद्ध ठाकरे गट आक्रामक!

**जळगाव ।** नाशिक येथील लैंगिक अत्याचार प्रकरणातील मुख्य आरोपी कॅप्टन अशोक खरात यांच्यावर कठोर कारवाई करावी तसेच या प्रकरणाशी नाव जोडले गेलेल्या राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांचा राजीनामा घेत त्यांना तत्काळ पदावरुन पायउतार करावे, अशी मागणी शिवसेना ठाकरे गटाने केली आहे. या मागणीसाठी ठाकरे गटाने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन केले. या आंदोलनाचे नेतृत्व शिवसेना ठाकरे गटाच्या महिला आघाडी प्रमुख मनीषा पाटील, उपजिल्हाप्रमुख भाऊसाहेब सोनवणे यांनी केले. आंदोलनादरम्यान रूपाली चाकणकर यांनी राजीनामा द्यावा,अशी मागणी करण्यात आली.

### आजपासून अमृत थेट बाजारपेठचे आयोजन

**जळगाव ।** स्थानिक उत्पादनांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासनाच्या महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधनी या संस्थेतर्फे अमृत थेट बाजारपेठ हा उपक्रम २१ व २२ मार्च रोजी जळगाव शहरात आयोजित करण्यात आला आहे. राज्यातील विविध शहरांमध्ये या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्यानंतर आता जळगावकरांना देखील याचा लाभ घेण्याची संधी उपलब्ध होणार आहे. या बाजारपेठेत एकूण ३६ स्टॉल उभारण्यात येणार असून त्यापैकी ३० हून अधिक स्टॉल महिला उद्योजकांचे असणार आहेत. ग्राहकांना थेट उत्पादकांकडून स्वदेशी व घरगुती दर्जेदार वस्तू खरेदी करता येणार आहेत. यामध्ये मसाले, रेडी फूड, इमिटेशन ज्वेलरी, हँडमेड वस्तू, साड्या, आयुर्वेदिक उत्पादने, पापड, वाळवण आदींचा समावेश आहे.

# वरणगाव पोलिस-रोहित्र चोरट्यांमध्ये घडला मध्यरात्री सिनेस्टाईल थरार !

## गस्तीवरील पोलिसांना संशय येताच सहा आरोपींना केले गजाआड

प्रतिनिधी । वरणगाव

**शेतकऱ्यांना अंधारात ढकलणाऱ्या विद्युत रोहित्र (डीपी) चोरांच्या टोळीवर वरणगाव पोलिसांनी मोठ्या शिताफीने रोहित्र चोरांच्या मुसक्या आवळल्या आहे. मध्यरात्री सिनेस्टाईल थरारक पाठलागानंतर सहा आरोपींना जेरबंद करण्यात आले असून डीपी व चारचाकी मालवाहूसह मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**



गेल्या काही दिवसांपासून वरणगाव परिसरात चोरीच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. या घटनांनी शेतकरी आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण केले होते. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी गस्त वाढवून सापळा रचला होता. (दि. १८) मध्यरात्री १२ वाजेच्या सुमारास गस्तीवर असलेल्या पोलिसांना पिंपळगाव खु परिसरात एक बोलेरो मालवाहू वाहन (एमएच १९, सीवाय १९७४) संशयास्पदरीत्या फिरताना दिसले. पोलिसांनी थांबवण्याचा इशारा दिला असता चालकाने वेगाने पळ काढत थरारक पाठलागाला सुरुवात झाली. पोलिसांनी तत्काळ सहाय्यक पोलीस निरीक्षक अमितकुमार बागुल यांना माहिती दिली. तत्काळ त्यांनी प्रसंगवधान दाखवत वरणगाव नागेश्वर मंदिर बोदवड मार्गावरून समोरून येत वाहनाला अडवले.

वाहनाची तपासणी करताच चोरी केलेले विद्युत रोहित्र (डीपी) उघडकीस आले आणि संपूर्ण टोळी पोलिसांच्या जाळ्यात अडकली. या कारवाईत अर्जुन सोनवणे, रविंद्र भिल, धिरज जोहरे, आरबाज शहा (रा. पिंपळगाव खुर्द) आणि इमरान शहा (रा. आर.एन. कॉलनी, भुसावळ) यांच्यासह एकूण सहा आरोपींना अटक करण्यात आली आहे.

पोलिसांनी आरोपींकडून सुमारे १.५० लाख रुपये किमतीचे डीपी आणि अंदाजे ५ लाख रुपये किमतीचे बोलेरो वाहन असा एकूण ६.५० लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक अमितकुमार बागुल यांच्या नेतृत्वाखाली गस्तीवरील पोलीस कर्मचारी साहेबराव कोळी, फिरोज पठाण, लतीफ तडवी, सुकराम सावकारे आणि गोपीचंद सोनवणे यांनी यशस्वीरित्या पार पाडली.

या कारवाईमुळे डीपी चोरी करणारी टोळी पकडल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून,आणखी गुन्ह्यांचा उलगडा होण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

## संघाने समाजाभिमुख मांडलेली पंचसूत्री उपयुक्त : सुदाम चौधरी

# चहार्डीत प्रथमच रा.स्व.संघाचा वर्ष प्रतिपदा उत्सव

प्रतिनिधी । चोपडा

**समाज आणि संघ या नाण्याच्या दोन बाजू आहेत. संघाने शतकी वाटचाल करतांना जातपात विरहित समाजासाठी कामकाज केले. डॉ.हेडगेवार यांनी निर्माण केलेली राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही संघटना संपुर्ण विश्वात अतुलनिय आहे,असे प्रतिपादन जळगाव जिल्हा गोसेवा संयोजक सुदाम चौधरी यांनी केले.**



संघ स्वयंसेवकांनी महापूर,भूकंप या सारख्या नैसर्गिक आपत्तीत स्वःताला झोकून देवून काम केले हे सर्वच जाणून आहेत. संघाच्या शताब्दी निमित्ताने पर्यावरण संरक्षण, कुटुंब प्रबोधन, सामाजिक समरसता, स्वदेशी आचरण आणि नागरी कर्तव्य या पंचसूत्रीने समाजाने भविष्यात वाटचाल करावी, असे आवाहन संघचालक डॉ.मोहन भागवत यांनी दिली आहे. त्याचा अवलंब जागृतपणे प्रत्येकाने करावा.त्यामुळे देश नक्कीच परमवैभवास जाईल, असा आशावाद जळगाव जिल्हा गोसेवा संयोजक सुदाम चौधरी यांनी चहार्डी येथे व्यक्त केला.

चहार्डी, ता.चोपडा येथे संघाच्या इतिहासात प्रथम साजरा झालेल्या वर्ष प्रतिपदा उत्सवात ते बोलत होते. यावेळी मंचावर जळगाव विभाग संघचालक राजेश पाटील, बोरमळी, ता.चोपडा येथील प्रगतीशिल शेतकरी बाबुराव पावरा होते. प्रास्ताविक कार्यवाह ज्ञानेश्वर साळुंखे यांनी केले. यावेळी नाना भामरे, कुशल गुजराथी, ज्ञानेश्वर साळुंखे यांनी अनुक्रमे विभाग,जिल्हा व तालुका कार्यकारणी जाहीर केली.

### ➢ अनोखे संचलन

**चहार्डी येथे प्रथमच रा.स्व.संघाचे शिस्तबद्ध संचलन या उत्सवानिमित्ताने सघोष पार पडले. गावातील अमृतेश्वर महादेव मंदिरापासून संचलनाला प्रारंभ होवून गावातील प्रमुख भागातून हे संचलन जावून त्याचा त्याच ठिकाणी समारोप झाला. या संचलनाबाबत ग्रामस्थात उत्सुकता दिसून येत होती. सर्वत्र संचलनावर पुष्पवृष्टी करण्यात आली. त्यात महिलांचा उत्सफुर्त सहभाग होता. यावेळी चोपडा तालुक्यातून शेकडो स्वयंसेवक उपस्थित होते.**

# पिंपळगाव येथे अखंड हरिनाम सप्ताहाचा समारोप

प्रतिनिधी । पाचोरा

**पिंपळगाव ता. पाचोरा येथे आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाचा समारोप काल्याच्या कीर्तनाने पार पडला. समारोपाच्या कार्यक्रमात ह.भ.प. योगेशजी महाराज यांच्या हस्ते भाजप नेते प्रणय ऊर्फ मुन्ना दिलीप भांडारकर यांचा सत्कार करण्यात आला.**



यावेळी मुन्ना भांडारकर यांनी सप्ताहासाठी ५१००/- रुपयांची देणगी देऊन सहभाग नोंदविला.

या कार्यक्रमाला पिंपळगाव येथील बापू माणिक पाटील, शिवाजी रामनाथ गायके, बंटी पाटील, राहुल गायके, बबलू पाटील, भूषण शिंदे, संदीप महाजन, दादा पाटील यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच माजी सरपंच रमेश गबा सोन्नी, माजी उपसरपंच विलास भामरे, इंद्रनील भामरे, कडू नाना पाटील यांच्यासह अनेक मान्यवर व पिंपळगाव - नगरदेवळा परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सप्ताहामुळे गावात एकत्रित येऊन भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

## एमटीएस परीक्षेत रिशान बोरोलेची उल्लेखनीय कामगिरी

प्रतिनिधी । चोपडा

**महाराष्ट्र टॅलेंट सर्च परीक्षामध्ये पंकज ग्लोबल पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्याने उल्लेखनीय यश संपादन करत शाळेचा गौरव वाढवला आहे. इयत्ता दुसरीमध्ये शिक्षण घेणारा रिशान पंकज बोरोले याने या परीक्षेत उत्कृष्ट कामगिरी नोंदवली आहे.**




रिशानने तालुकास्तरीय गुणवत्ता यादीत ६ वा क्रमांक, जिल्हास्तरीय गुणवत्ता यादीत २० वा क्रमांक तसेच राज्यस्तरीय गुणवत्ता यादीत २८ वा क्रमांक मिळवत आपली गुणवत्ता सिद्ध केली. त्याने २०० पैकी ११६ गुण प्राप्त करत स्पर्धात्मक परीक्षेत आपली चमक दाखवली आहे. या यशामागे त्याचे सातत्यपूर्ण परिश्रम, शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन आणि पालकांचे भक्कम सहकार्य हे घटक महत्त्वाचे ठरले. त्याच्या या उल्लेखनीय यशाबद्दल शाळेच्यावतीने त्याचे अभिनंदन करण्यात आले असून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी त्याला शुभेच्छा दिल्या. त्याला मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकवृंद व पालकांचेही अभिनंदन करण्यात आले आहे. रिशानच्या या यशामुळे शाळेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षण परंपरेला आणखी बळ मिळाले आहे.

# भूमी सुपोषण अभियानात समाजातील सर्व घटकांनी सहभागी व्हावे

## केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांचे प्रतिपादन ; अमळनेरातून राष्ट्रीय चळवळीचा झाला शुभारंभ

प्रतिनिधी । अमळनेर

**सर्वांसाठी जीवनदायीनी असलेल्या भूमी मातेचा चैत्र शुद्ध वर्ष प्रतिपदेला अर्थात गुढीपाडव्याला जन्म दिवस असतो. या मंगलदिनी भूमी सुपोषण राष्ट्रीय अभियानाचा श्री मंगळग्रह मंदिरातून शुभारंभ होत आहे याचा मनस्वी आनंद आहे. हे अभियान संपूर्ण देशात राबविण्यात येणार असून यात सर्व समाजघटकांनी सहभागी व्हावे. अन्नदात्या भूमीला आई मानून जैविक शेती करावी, असे आवाहन केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी केले.**



अक्षय कृषी परिवार व मंगळग्रह सेवा संस्थेच्या संयुक्त विद्यमाने दि. १९ मार्च रोजी श्री मंगळग्रह मंदिरातून झालेल्या भूमी सुपोषण या राष्ट्रीय अभियानाच्या शुभारंभप्रसंगी ते बोलत होते. प. पू. स्वामी नृसिंह विजयेंद्र सरस्वती, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे क्षेत्रीय कार्यवाह बाळासाहेब चौधरी, पद्मश्री डॉ.सुभाष शर्मा, महाराष्ट्र व छत्तीसगड मंदिर महासंघाचे संयोजक सुनील घनवट, अक्षय कृषी परिवाराचे अध्यक्ष मनोज सोलंकी, उपाध्यक्ष डॉ. गजानन डांगे, युवा कल्याण व क्रीडा केंद्रीय राज्यमंत्री रक्षाताई खडसे, पालकमंत्री गुलाबराव पाटील, जलसंपदा, आपत्ती व्यवस्थापनमंत्री गिरीश महाजन, खासदार स्मितताई वाघ, आमदार अनिल पाटील व मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले आदी व्यासपीठावर विराजमान होते. ना. चौहान यांनी उपस्थित सर्व मंत्री व लोकप्रतिनिधींसह कृषी अवजारांच्या प्रदर्शनाला भेट दिली. ना. शिवराजसिंह चौहान पुढे म्हणाले, ज्या मातीत आपण जन्मलो त्या मातीला माणूस विसरला आहे. पूर्वीच्या काळी शेतकरी नैसर्गिक शेती करीत होते. सेंद्रीय खतांचा वापर करत होते. त्यामुळे उत्पादनही चांगले व अन्नातही कस होता. मात्र, आता उत्पादन वाढविण्यासाठी विविध रासायनिक खतांचा वापर सुरू आहे. त्यामुळे भूमी मातेचे शोषण होत आहे. त्याचा परिणाम आपल्या आरोग्यावर होत आहे. भूमी मातेसाठी ममत्वाची भावना ठेवून तीला आई मानावे व नैसर्गिक शेतीचा संकल्प करावा,असे आवाहन त्यांनी केले. यावेळी मान्यवरांची भाषणे झाली. सुरवातीला राजेंद्र वाघ यांनी गीत सादर केले. नवल रघुवंशी व देवेंद्र तायडे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. डिगंबर महाले यांनी प्रास्ताविक केले. श्री मंगळग्रह मंदिर परिसरात प्रसादालयाच्या पाठीमागे सुंदर रोपवाटिका व निसर्गरम्य व्यवस्था केली. सदर संतश्री सखाराम महाराज रोपवाटिकेचे लोकार्पण ना. शिवराजसिंह चौहान यांच्या हस्ते झाले.

# चोपडा तालुक्यातून जिग्नेश देवरे एमटीएस परिक्षेत प्रथम

प्रतिनिधी । चोपडा

**एमटीएस परीक्षेचे निकाल नुकतेच जाहीर झाले असून त्यात चोपडा येथील पंकज विद्यालयातील इयत्ता चौथीचा विद्यार्थी जिग्नेश सुनील देवरे याने यश संपादन करीत चोपडा तालुक्यातून प्रथम क्रमांक पटकविला आहे.**



जिग्नेशने या परिक्षेत जळगाव जिल्ह्यातून पाचवा तर राज्यात आठवा क्रमांक उत्तीर्ण होण्याचा बहुमान मिळविला आहे. त्याच्या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक आणि शारदा क्लासेसच्या शिक्षकांनी त्याचे कौतुक केले. जिग्नेश देवरे हा चोपडा न्यायालयातील कर्मचारी सुनील देवरे यांच्या मुलगा आहे. त्याच्या या यशाबद्दल त्याचे चोपडा तालुक्यासह परिसरातून कौतुक होत आहे.

# वीज कोसळून सहा एकर गव्हाच्या पेंड्या खाक

## विल्हाळा शिवारातील घटना : लाखोंचे नुकसान



**प्रतिनिधी । भुसावळ**

**तालुक्यातील विल्हाळा शेती शिवारातील सहा एकर क्षेत्रातील गव्हाच्या पेंढ्यांचा ढीग वीज कोसळल्याने जळून खाक झाला आहे.**

दि.१९ मार्च रोजी रात्री आलेल्या वादळी अवकाळी पाऊस विजांच्या कडकडाटात कोसळला. यावेळी वीज कोसळून विल्हाळा शेती शिवारातील दीपक सोपान वारके व नयना दीपक वारके यांच्या गट नंबर ७४६ मध्ये सहा एकर क्षेत्रात गव्हाच्या पेंढ्या गहू काढण्यासाठी गोळा करून एकत्र ढीग करून ठेवलेल्या होत्या.

मात्र अवकाळी पाऊस पडत असताना वीज कोसळून झालेल्या घटनेत संपूर्ण क्षेत्रातील गव्हाच्या पेंढ्या जळून खाक झाल्या. त्यामुळे दीपक वारके व नयना वारके यांचे सुमारे अडीच ते तीन लाख रुपयांचा गहू जळून खाक झाला. परिणामी अगदी हाता-तोंडाशी आलेला रब्बी हंगामातील घास डोळ्यादेखत जळून खाक झाल्याने संबंधित कुटुंबाचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. अगोदरच खरीप हंगाम पूर्णतः हाती आलेला नाही. त्यातही रब्बीचे असे नुकसान झाल्याने संबंधित कुटुंब हतबल झाल्याचे दिसून आले. महसूल व कृषी विभागाने लवकरात लवकर पंचनामा करून आर्थिक मदत देऊन कुटुंबाला दिलासा देण्याची मागणी शेतकरी वर्गातून करण्यात येत आहे.

**शिंदीसह परिसरात पावसाचे थैमान पिकांचे नुकसान**

भुसावळ - शिंदीसह मोंढाळा, मानमोडी, विचवा परिसरात सायंकाळी ६.४५ ते ८.१५ वाजेच्या दरम्यान असा सुमारे सव्वातास जोरदार विजांच्या गडगडात पाऊस झाला. शेती शिवारातून पाणी वाहून निघाले. परिणामी शेतकऱ्यांची मोठी धांदल उडाली. कापणीला आलेला गहू, हरभरा, मका या पिकाचे व गुरांसाठी साठवून ठेवलेल्या कडबा पेंढ्यांचे मोठ्याप्रमाणावर नुकसान झाल्याचे येथील युवा शेतकरी भूषण पुनमसिंग राजपूत यांनी सांगितले. पाऊस सुरू असतानाच वीज गेल्यामुळे गावातही अचानक आलेल्या या पावसामुळे ग्रामस्थांची धावपळ झाल्याचे दिसून आले. मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. महसूल व कृषी विभागाने तातडीने शेतीशिवारात पंचनामे करण्याची गरज असल्याचे सामाजिक कार्यकर्त्या निलिमा नेमाडे यांनी सांगितले. रात्रीची वेळ असल्याने गावासह शेती शिवारातील नुकसानीचा अंदाज येऊ शकला नाही, मात्र मोठ्याप्रमाणावर शेतीशिवारात हानी झाल्याचे सांगण्यात आले. गहू पिकाची काढणी सुरू झाली आहे. पावसाने गहू भिजला असेल तर त्याचा परिणाम भावावर होऊ शकतो, असा शेतकऱ्यांचा कयास आहे.

**● विल्हाळा शेतीशिवारात अवकाळी पाऊस पडत असताना वीज कोसळून झालेल्या घटनेत संपूर्ण क्षेत्रातील गव्हाच्या पेंढ्या जळून खाक झाल्या. त्यामुळे दीपक वारके व नयना वारके यांचे सुमारे अडीच ते तीन लाख रुपयांचा गहू जळून खाक झाला. संबंधित कुटुंबाचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. रब्बीचे असे नुकसान झाल्याने संबंधित कुटुंब हतबल झाल्याचे दिसून आले. भुसावळ - शिंदीसह मोंढाळा, मानमोडी, विचवा परिसरात सायंकाळी ६.४५ ते ८.१५ वाजेच्या दरम्यान असा सुमारे सव्वा तास जोरदार वादळी वाऱ्यासह विजांच्या गडगडात पाऊस झाला.**

## थोडक्यात

### बारागाड्याखाली आल्याने एकाचा मृत्यू



**भुसावळ ।** तालुक्यातील गोजोरा येथे गुढीपाडव्यानिमित्त मरिमातेच्या यात्रेनिमित्त बारागाड्या आयोजन करण्यात आले होते. यावेळी बारागाड्याखाली आल्याने एकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. दि.१९ रोजी संध्याकाळी चोरवड-गोजोरा रस्त्यावर असलेल्या श्री मरिमाता यात्रेनिमित्त बारागाड्या आयोजन करण्यात आले होते. यावेळी चौथ्या-पाचव्या गाडीखाली अशोक बाबूराव कोळी (वय ५७) हे आल्याने त्यांच्या अंगावरुन गाड्या गेल्याने गंभीर जखमी झाले. जखमी अशोक कोळी यांना भुसावळ येथील डॉ. राजेश मानवतकर यांच्याकडे दाखल करण्यात आले असता, उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे गावात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. मयत अशोक कोळी यांच्या पश्चात पत्नी, मुले, मुलगी असा परिवार आहे. या घटनेबाबत भुसावळ तालुका पोलिसांना माहिती देण्यात आली असून तालुका पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.

## बीडगाव येथे रमजाननिमित्त विधवा महिलांना कपड्यांचे वाटप

### सिकंदर तडवी व मगन बाविस्कर यांचा दातृत्वशाली उपक्रम



**प्रतिनिधी । चोपडा**

**तालुक्यातील बिडगाव येथे पवित्र रमजान महिन्याचे औचित्य साधून आणि ईदचा आनंद सर्वांना मिळावा या उदात्त हेतूने, सिकंदर तडवी यांच्या विशेष प्रयत्नातून व पुनगावचे सुपुत्र तसेच भाजपा अनु.जमातीचे जिल्हाध्यक्ष मगन बाविस्कर यांच्या वतीने विधवा महिलांना नवीन कपड्यांचे वाटप करण्यात आले.**


या उपक्रमामुळे अनेक कुटुंबांच्या चेहऱ्यावर समाधानाची लकिरे उमटलेली दिसून आली. रोजा इफ्तार पार्टी या कार्यक्रमात रोजेदारांसाठी विविध फळे तसेच गावातील महिलांना साड्या वाटप करण्यात आल्या. रमजान हा महिना दानधर्माचा मानला जातो, याच भावनेतून समाजातील उपेक्षित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी मगन बाविस्कर यांच्याकडून हा छोटासा उपक्रम राबविण्यात आला. सण साजरे करताना गरजू व्यक्तींचा विचार करणे हीच खरी माणुसकी आहे. विधवा महिलांना सन्मानाने जगता यावे आणि त्यांना सणाचा आनंद घेता यावा, यासाठी घेतलेला हा पुढाकार कौतुकास्पद ठरला आहे. याप्रसंगी अनु. जमाती जिल्हाध्यक्ष भाजपा, मगन बाविस्कर यांच्यासह जि.प.सदस्य.गजेंद्र सोनवणे हातेड. जिल्हा अध्यक्ष भाजपा ओबीसी मोर्चा. पंकज पाटील, परेश धनगर सरपंच नरवाडे, अनु जमाती माजी जिल्हा सरचिटणीस दीपक बाविस्कर, भाजपा तालुका सहचिटणीस एकनाथ पाटील यांची विशेष उपस्थिती होती. सिकंदर तडवी , प्रकाश आबा पाटील, दीपक पाटील, विनायक पाटील, देविदास पाटील, रामकृष्ण पोलीस पाटील, रशीद तडवी, अजमत तडवी,पत्रकार खलील तडवी, पत्रकार मन्सूर शाह,इरफान तडवी, रुस्तुम तडवी, समीर तडवी व समाज बांधव, ग्रामस्थ उपस्थित होते.

## वादळी वाऱ्यामुळे गणपूर परिसरात पिकांचे नुकसान

**प्रतिनिधी । चोपडा**

**तालुक्यातील गणपूर येथे व परिसरात काल सायंकाळी व रात्री आलेल्या वादळी वाऱ्यामुळे पिकांसह आंब्याच्या कैऱ्या गळून पडल्या असून नुकत्याच पाणी भरलेले मका व ज्वारीचे पीक आडवे पडून नुकसान झाले आहे.**

काल सायंकाळपासून रात्री उशिरापर्यंत येथे व परिसरात मोठ्या प्रमाणात वादळी वारे सुरू राहिल्याने गणपूर, मराठे, हातेड, गलवाडे, गलंगी, वेळोदे आदी गावांच्या शिवारात आंब्याच्या झाडांवर पक्व होणाऱ्या कैऱ्या व लहान कैऱ्या मोठ्या प्रमाणात गळून पडल्या. तर पाणी भरलेले मका व ज्वारीचे पीक आडवे पडल्याचे गलवाडे(ता चोपडा) येथील शेतकरी प्रदीप नागो देसले यांनी सांगितले. दादर , दुरई तसेच काढणीला आलेल्या गव्हाच्या पिकाला सर्वाधिक फटका या अवेळी आलेल्या वादळी पावसाने बसला आहे. गहू काही भागात काढणीला आहे. वादळी पावसाने गहू आडवा पडून खराब होण्याची भीती व्यक्त होत आहे.



## प.पु.गुरुमाऊलींच्या वाढदिवसानिमित्त शालेय साहित्य वाटप

**प्रतिनिधी । पिंपळगाव हरेश्वर**

**श्री स्वामी समर्थ सेवेकरी संदीप पाटील वडगावकडे व गजानन लादे यांच्या संयुक्त विद्यमाने जवळपास १० शाळांमध्ये श्री स्वामी समर्थ सेवा मार्गाचे प्रमुख दिंडोरी दरबार येथील परमपूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या वाढदिवसानिमित्त मुलांचे उपयुक्त शालेय साहित्य वाटप करण्यात आले.**

परमपूज्य गुरुमाऊली म्हणतात श्री स्वामी समर्थ सेवा मार्गामध्ये ८० टक्के समाजसेवा २० टक्के अध्यात्म असुन समाजासाठी चांगले काम व संस्कार आदर्श नागरिक घडवण्याचं कार्य व नवीन पिढीला निर्व्यसनी करण्याचं काम श्री स्वामी समर्थ सेवा मार्गाच्या माध्यमातून होत आहे आणि हे सर्व संस्कार परमपूज्य गुरुमाऊली लोकांना देतात. या अनुषंगातून परमपूज्य गुरुमाऊलींच्या वाढदिवसानिमित्त कडे वडगाव केंद्र गेल्या तीन-चार वर्षापासून परिसरातील शाळांना शालेय साहित्य वाटप करत असतात. दरवर्षाप्रमाणे याही वर्षी परमपूज्य गुरुमाऊलींच्या वाढदिवसानिमित्त वाडी शेवाळे, सातगाव तांडा, गहले, शिंदाड, सार्वे पिंप्री, डोंगरगाव अशा विविध शाळांमध्ये शालेय साहित्य वाटप करण्यात आले.



## ईबादतीतून उमटले श्रद्धेचे रंग




**प्रतिनिधी । चोपडा**

**रमजान ईद निमित्ताने स्वा. सै. श्री शामराव गोविंदा पाटील माध्यमिक विद्यालय, वर्डी ता. चोपडा येथे मुख्य फलकावर आकर्षक व भावपूर्ण चित्रफलक साकारण्यात आला.**

या चित्रामध्ये ईबादत करत असलेली मुलगी आणि तिच्या पार्श्वभूमीला सुंदर मस्जिदचे चित्र रेखाटण्यात आले आहे. या कलाकृतीतून रमजान महिन्यातील श्रद्धा, शांती, संयम आणि अध्यात्मिकतेचा सुंदर संदेश देण्यात आला आहे. चित्रातील रंगसंगती, रचना व अक्षरांची जोडवा-जोड यामुळे फलक अधिक आकर्षक व प्रभावी दिसून येत आहे.

ही कलाकृती विद्यालयातील कला शिक्षक भूषण सानप यांनी साकारली आहे. विद्यार्थ्यांमध्ये धार्मिक सहिष्णुता, बंधुता आणि सामाजिक एकात्मता वाढीस लागावी हा उद्देश या उपक्रमामागे आहे. विद्यालयाचे मुख्याध्यापक मोहन चव्हाण व शिक्षकवर्ग यांनी या उपक्रमाचे कौतुक केले आहे. विद्यार्थ्यांनीही या चित्रफलकाबद्दल उत्साह व्यक्त केला. यापूर्वीही भूषण सानप यांनी वि.दा. सावरकर, महात्मा गांधी, लोकमान्य टिळकआदी थोर पुरूषाचेआकर्षक चित्र कृती साकारल्या आहेत. त्याच्या कलाकृतींना प्रसिध्दी मिळाली आहे.

## प्रज्वल भालेराव यांची लेफ्टनंटपदी निवड झाल्याबद्दल केला सत्कार

**प्रतिनिधी । वरणगाव**

येथील आयुध निर्माणी वसाहतीमध्ये राहणारा प्रज्वल संजीव भालेराव यांची भारतीय सैन्यात लेफ्टनंट म्हणून नियुक्ती झाली आहे. तो ६६व्या बॅचचा अधिकारी आहे.

या यशाबद्दल त्यांचा आयुध निर्माणी वरणगाव येथे नुकताच जाहीर सत्कार करण्यात आला. प्रसंगी उघड्या जिपमध्ये प्रज्वल आणि समोर सैनिक यश सिद्धी यांना सलामी देत कम्युनिटी हॉलपर्यंत मिरवणूक काढण्यात आली. यावेळी निर्माणीचे मुख्य महाप्रबंधक एम.झेड सरवर, लेफ्टनंट कर्नल इसाक नदाफ, एस.के. नव्हाळे यांनी त्याचा सत्कार केला आहे. कार्यक्रमात संयुक्त महाप्रबंधक दिनेश नाईकनवरे, अन्य अधिकारी, व्ही.के.कोल्हे, अमरसिंह राठोड, एन.के. महाले, संभाजी पवळे, एन.एन. गायकवाड आदी उपस्थित होते.

## चार वेद व पवित्र धर्मग्रंथांचा पालखी सोहळा उत्साहात

**प्रतिनिधी । भुसावळ**

**येथील ब्राह्मण संघ आयोजित यंदाही वर्ष प्रतिपदेला हिंदू नववर्ष दिन म्हणजे गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर पवित्र धर्मग्रंथ चार वेद तसेच रामायण, महाभारत, श्रीमद भगवत गीता, ज्ञानेश्वरी, दासबोध, तुकाराम गाथा, एकनाथी भागवत या ग्रंथांचे पूजन व पालखी मिरवणूक सोहळा सकाळी ८.३० ते ९.३० या वेळेत संपन्न झाला.**



पालखी सोहळ्याला सकल हिंदू समाज प्रतिनिधी राजेश कोष्टी, उज्ज्वल सराफ, अशोक गुरव भादलीकर, श्याम माहूरकर, यश इंगळे, अभिमन्यू टेमकर यांच्यासह ब्राह्मण संघांचे अध्यक्ष गणेश वढवेकर यांनी चार वेद व पवित्र धर्मग्रंथाचे पूजन करून सुरुवात केली. पालखी सोहळ्यात सहभागी झाले. यावेळी श्रीमती डॉ. सुषमा खानापूरकर, कल्पना दामले, वैशाली एकलारकर, मृदुला गोडबोले, लक्ष्मी वढवेकर, प्रतिभा बोचरे, साधना रिसबूड या माहिलांसह माजी नगरसेवक दिलीप सुरवाडे, संघांचे माजी सचिव प्र.ह. दलाल, संघांचे विद्यमान सचिव महेंद्र गोडबोले, कोषाधक्ष अमोद टेंभूर्णीकर, पंकज जोशी, जयंत जोशी, शंतनू गचके, डॉ.प्रा. रमेश जोशी, संजय बोचरे, सुनील पाठक, प्रणव वढवेकर, संघांचे व्यवस्थापक अशोक पाटील व विविध समाजाचे अध्यक्ष, सचिव, प्रतिनिधी उपस्थित होते.

# चोपडा महाविद्यालयात आंतर विभागीय वेटलिफ्टिंग स्पर्धेचे आयोजन

## ● आंतर विभागीय वेटलिफ्टिंग पुरुष व महिलांसाठी स्पर्धेचे यशस्वीरित्या आयोजन

**प्रतिनिधी । चोपडा**

**महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे दादासाहेब डॉ. सुरेश जी. पाटील महाविद्यालय, चोपडा येथे कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव आणि दादासाहेब डॉ. सुरेश जी. पाटील महाविद्यालय, चोपडा यांच्या संयुक्त विद्यमाने आंतर विभागीय वेटलिफ्टिंग पुरुष व महिला स्पर्धेचे यशस्वीरित्या आयोजन करण्यात आले होते.**

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. के. एन. सोनवणे उपस्थित होते. तसेच क. ब. चौ. उ. म. विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. दिनेश पाटील यांच्या हस्ते शक्तीचे प्रतीक श्री हनुमाच्या प्रतिमेचे पूजन करून स्पर्धेचे उदघाटन करण्यात आले. या उदघाटन प्रसंगी डॉ. दिनेश पाटील यांनी खेळाडूंना स्पर्धेत सहभागी होतांना वर्षभर मेहनत करून आपण पदक प्राप्त करण्याच्या



उद्देशाने सराव केला तर त्याचे फळ अवश्य मिळते म्हणून जास्तीत जास्त संख्येने सहभागी होऊन पदक प्राप्त करण्याची आशा व्यक्त करून बहुमूल्य असे मार्गदर्शन केले.त्याचप्रमाणे याप्रसंगी निवड समिती सदस्य प्रा.डॉ. गोविंद मारतळे, क्रीडा संचालक, फैजपूर यांनीही क्रीडा क्षेत्रात करिअरच्या भरपूर संधी उपलब्ध आहेत.पदक प्राप्त केल्यामुळे आपल्याला नोकरी मिळू शकते याविषयी नोकरीं मिळालेल्या खेळाडूंचे उदाहरणे देऊन बहुमूल्य मार्गदर्शन करून खेळाडूंना स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.या स्पर्धेसाठी संस्थेचे अध्यक्ष ॲड.संदीप सुरेश पाटील यांनी स्पर्धेसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. तसेच सचिव, डॉ. स्मिता पाटील यांनी स्पर्धेच्या ठिकाणी भेट दिली असता खेळाडूंची मेहनत आणि कामगिरी बघून त्यांचे कौतुक केले. याप्रसंगी निवड समिती सदस्य डॉ. दिनेश तांदळे, भडगाव, डॉ. मुकेश पवार, भालोद, उपप्राचार्य प्रा.डॉ. आर. एम. बागुल, उपप्राचार्य प्रा.डॉ. ए. बी. सूर्यवंशी, समन्वयक डॉ. एस. ए. वाघ, , अमळनेर येथील डॉ. शैलेश पाटील, चोपडा येथील डॉ. विजय पाटील, नवल नगर येथील प्रा. विजय शिंदे इ. मान्यवर उपस्थित होते. यावेळी धुळे, जळगाव, नंदुरबार आणि एरंडोल या विभागातून खेळाडू आले होते. या स्पर्धामधून निवड झालेले खेळाडू चेन्नई येथे संपन्न होणाऱ्या अखिल भारतीय स्पर्धामध्ये सहभागी होणार आहेत. या स्पर्धांचे आयोजन व नियोजन वरिष्ठ महाविद्यालयाच्या क्रीडा संचालक डॉ. क्रांती सं. क्षीरसागर यांनी केले.स्पर्धा यशस्वीतेसाठी जिमखाना विभागातील अमोल पाटील, सुधाकर बाविस्कर आणि आर. एच. पाटील यांचे सहकार्य लाभले.